# दृष्टिहीनांबाबतचा दृष्टिकोन बदलण्यासाठी 'अक्षरतेज'!

**सुनील नांदगावकर**
**मुंबई, ४ मार्च**

'पत्रकार म्हणून कारकीर्द सुरू करताना आपल्याला दैनंदिन वृत्तपत्रात प्रवेश मिळणार नाही, याची पुरती खात्री होती. हे लक्षात घेऊनच केवळ दृष्टिहीन म्हणजे अंधच नव्हेत तर त्याबाहेरच्या म्हणजे डोळस व्यक्तींशीही संवाद साधता यावा आणि त्यांचा दृष्टिहीनांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा म्हणून 'अक्षरतेज' हा विशेषांक प्रसिद्ध करण्याचे आपण ठरविले, असे या अंकाची संपादिका अनुजा संखे हिने 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या मास्टर्स इन कम्युनिकेशन ॲण्ड जर्नलाझिम या पदव्युत्तर पत्रविद्या अभ्यासक्रमात शिकणारी पहिली दृष्टिहीन विद्यार्थिनी असलेल्या अनुजा संखे हिने 'डोळस'मध्ये (म्हणजे छापील पद्धतीत) 'अक्षरतेज' या विशेषांकाची संकल्पना मांडली असून पहिल्या अंकाचे प्रकाशन उद्या, शनिवारी सायंकाळी ४.३० वाजता पत्रकार निखिल वागळे यांच्या हस्ते परळच्या शिरोडकर हायस्कूलच्या सभागृहात होत आहे. यावेळी प्रसिद्ध लेखक अनंत सामंत आणि अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या उषा तांबे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

याविषयीची संकल्पना सांगताना ती म्हणाली की, अंध मित्रमैत्रिणींमध्ये अंकाविषयीची संकल्पना बोलून दाखवली. त्यांच्याशी केलेल्या चर्चेतून असे ठरविले की अंधांसाठी अंक काढायचा तर मग तो फक्त ब्रेल लिपीतच काढावा लागेल आणि अन्य लोकांपर्यंत पोहोचता येणार नाही. म्हणून मग या 'अक्षरतेज' विशेषांक सर्वांना वाचता यावा म्हणून 'डोळस'मध्ये (छापील) काढण्याचे ठरविले. अंकातील मजकुराविषयी माहिती देताना अनुजा म्हणाली की, अंध व्यक्तींनी लिहिलेले साहित्य 'डोळस'मध्ये आणणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे हाही हेतू 'अक्षरतेज' विशेषांक काढण्यामागे आहे. पहिल्या अंकातील महत्त्वाचा भाग असा की, अंध विद्यार्थ्यांना, अंध व्यक्तींना शैक्षणिक कामात मदत करणारे रीडर, रायटर, शिक्षक हे 'डोळस' असतात. अंधांविषयी सर्वसाधारणपणे लोकांना सहानुभूती वाटते. परंतु, त्यापलीकडे जाऊन अनेक गृहिणी रीडर, रायटर म्हणून आम्हाला मदत करतात. मग आम्हाला वाचून दाखवण्याचे काम 'डोळस' असूनही त्या का करतात, त्यांना का करावेसे वाटते, त्यामागची त्यांची मनोभूमिका काय असते हे लोकांपुढे यायला हवे असे मनापासून वाटत होते. म्हणून त्यांचे विचार 'अक्षरतेज'च्या या अंकात घेतले आहेत.

या अंकाची संकल्पना सुचल्यानंतर अनुजाने तिचा अंध मित्र भरत घोडके आणि चंद्रशेखर गोखले सरांची मदत घेतली. अंकाचे डीटीपी करण्यापासून ते अंक छपाईला पाठविण्यापर्यंत पत्रकार शरद विचारे यांनी तिला मोलाचे सहाय्य केले आहे, असे अनुजाने आवर्जून नमूद केले. महत्त्वाचे म्हणजे अक्षरतेज हा विशेषांक www.bookganga.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाणार आहे. ■